महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : १४४२/समोवानि/२०२०/२४ दिनांक:- १० ऑक्टोबर, २०२२

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**विषय :- सहायक मोटार वाहन निरीक्षक (मुख्य) परीक्षा- २०२०**
**सुधारित सर्वसाधारण गुणवत्ता यादी**

**संदर्भ :- जाहिरात क्रमांक ०२/२०२० व ०५९/२०२१**

**सहायक मोटार वाहन निरीक्षक (मुख्य) परीक्षा- २०२०** या परीक्षेची सर्वसाधारण गुणवत्ता यादी आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक २२ मार्च, २०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. गुणवत्ता यादीसंदर्भात मा. मॅट, मुंबई येथे दाखल न्यायिक प्रकरणी मा. न्यायाधिकरणाने दिलेले आदेश विचारात घेऊन, प्रस्तुत पदाची सुधारित गुणवत्ता यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**२.** सदर सुधारित सर्वसाधारण गुणवत्ता यादी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून उमेदवारांच्या अर्जामधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अंतिम निकालापूर्वी प्रमाणपत्र/कागदपत्रे यांची पडताळणी करताना काही उमेदवारांच्या दाव्यांमध्ये बदल होऊ शकतो.

**३.** खेळाडू प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची क्रीडाविषयक कागदपत्रे प्राधिकृत क्रीडा अधिका-यांनी तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून त्यांचा खेळाडू प्रवर्गाचा दावा तात्पुरता ग्राह्य धरून त्यांचा सुधारित सर्वसाधारण गुणवत्ता यादीमध्ये समावेश करण्यात आला आहे.

**४.** प्रस्तुत सुधारित सर्वसाधारण गुणवत्ता यादी मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणामध्ये दाखल विविध न्यायिक प्रकरणांमधील न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात येत आहे.

**उप सचिव (परीक्षोत्तर) (अ.प.)**

**ठिकाण – मुंबई** **महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई**